
सर्वमंगल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।।

संस्थापक डी. एन. शिर्के यांचे सर्वाधिक लोकप्रिय प्रकाशन ।। श्री गुरुदेव दत्तात्रेय प्रसन्न ।। मुंबई, पुणे व कोंकण आवृत्ती



✲ ।। श्री महालक्ष्मी प्रसन्न ।। ✲

शास्त्रशुध्द संपूर्ण वार्षिक पंचांग

# श्री महालक्ष्मी ®

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर

Mahalaxmi.org.in

## ५ मे २०२५

वैशाख–ज्येष्ठ | श्री शालिवाहन शके १९४७ | विक्रम संवत् २०८१ | शिवशक ३५१ | सौर ग्रीष्म ऋतू | उत्तरायण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **रवि** | **राहू काल**<br>रविवार – सायं.४.३० ते ६.००<br>सोमवार – सकाळी ७.३० ते ९.००<br>मंगळवार – दुपारी ३.०० ते ४.३०<br>बुधवार – दुपारी १२.०० ते १.३०<br>गुरुवार – दुपारी १.३० ते ३.००<br>शुक्रवार – सकाळी १०.३० ते १२.००<br>शनिवार – सकाळी ९.०० ते १०.३० | वैशाख शु.७ पुष्य<br>**४**<br>भानुसप्तमी<br>मल्लिकार्जुन यात्रा कारकल ता.द.सोलापूर, कालिकादेवी मंदिर प्रतिष्ठापना दिन यात्रा सांगली नागनाथ(श्रींचे गण) यात्रा मोहोळ जि.सोलापूर मु.५ | वैशाख शु.१४ स्वाती<br>**११**<br>मदर्स डे<br>**श्री नृसिंह जयंती**<br>पौर्णिमा रात्री ८.०१ नंतर<br>श्री नृसिंह नवरात्र समाप्ती<br>कृत्तिकार्कः दुपारी १.१७<br>राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन मु.१२ | वैशाख कृ.६ उत्तराषाढा<br>**१८**<br>श्री रामसिध्द महाराज यात्रा रामहिंगणी जि.सोलापूर मु.१९ | वैशाख कृ.१३ अश्विनी<br>**२५**<br>शिवरात्री<br>रोहिण्यर्कः सकाळी ९.३०<br>अण्णाबुवा पुण्यतिथी गिरोली जि.कोल्हापूर मु.२६ |
| **सोम** | **गोव्यातील उत्सव**<br>दि.२<br>श्री लईराई जत्रा शिरगाव, श्री महालक्ष्मी वर्धापन दिन हरमल–पेडणे<br>दि.११<br>वेलींग जत्रा<br>दि.१२<br>श्री सातेरी व महालसा पालखी उत्सव म्हार्दोळ<br>दि.१४<br>श्री शोमू पुरुष वर्धापन दिन सालगाववाडा व अडवलपाल<br>दि.२१<br>श्री नवदुर्गा प्रकटोत्सव मडकई–पारांपई | वैशाख शु.८ आश्लेषा *दुर्गाष्टमी*<br>**५**<br><br>**शंकर महाराज पु.ति.पुणे**<br>महादेव यात्रा खळद ता.पुरंदर भैरवनाथ यात्रा देऊळगाव रसाळ ता.बारामती व बावडा ता.इंदापूर जि.पुणे मु.६ | वैशाख शु.१५ स्वाती<br>**१२**<br><br>**बुध्द पौर्णिमा** रा.१०.२५ प.<br>कुलधर्म,कुर्म जयंती,पुष्टिपती विनायक जयंती, अंबिकामाता उत्सव ओझर ता.जुन्नर<br>**परिचारिका दिन** मु.१३ | वैशाख कृ.६/७ श्रवण<br>**१९**<br>धनिष्ठा नवकारंभ रात्री ७.२९ नंतर, श्री सिध्देश्वर महाराज उत्सव कोल्हापूर मु.२० | वैशाख कृ.१४ भरणी/कृत्तिका<br>**२६**<br>सावित्री–१४<br>**श्री शनैश्चर जयंती**<br>**दर्श भावुका सोमवती अमावास्या** दु.१२.१२ नंतर<br>रुद्रपशुपती महाराज पु.ति. निमसोड ता.खटाव मु.२७ |
| **मंगळ** | | वैशाख शु.९ मघा<br>**६**<br><br>**राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुण्यदिन**<br>जानकी जन्म, सीता नवमी ताम्हणकर महा.जयंती सांगली धोंडीराज महाराज पु.ति.पलूस रहिमतपूर उरूस मु.७ | वैशाख कृ.१ विशाखा<br>**१३**<br>नारद जयंती वीणादान<br>दिगंबरदास महाराज पुण्यतिथी पुणे मु.१४ | वैशाख कृ.८ धनिष्ठा<br>**२०**<br>कालाष्टमी<br>महाराजा मल्हारराव होळकर पुण्यदिन, श्री वासुदेव आरे महाराज जयंती पंढरपूर<br>मिथुनायन उ.रात्री १२.२४<br>**पंचक** स.७.३४ नंतर मु.२१ | वैशाख कृ.३०/ज्येष्ठ शु.१ रोहिणी<br>**२७**<br><br>**पंडित नेहरू पुण्यदिन**<br>**अमावास्या** स.८.३२ पर्यंत<br>गंगादशहरा प्रारंभ, करिदिन<br>श्री भैरवनाथ यात्रा बाभुळसर खुर्द ता.शिरूर जि.पुणे मु.२८ |
| **बुध** | | वैशाख शु.१० पूर्वा फाल्गुनी<br>**७**<br>गुरुदेव रवींद्रनाथ टागोर जयंती<br>श्री महालक्ष्मी नैवेद्य यात्रा उगार खुर्द ता.अथणी, श्री महालक्ष्मी देवस्थान वार्षिकोत्सव जत्रा राणी चन्नमानगर बेळगाव मु.८ | वैशाख कृ.२ अनुराधा.<br>**१४**<br><br>**छ.संभाजीराजे जयंती**<br>अमृत सकाळी ११.४६ पर्यंत<br>**वृषभ संक्रांती** उ.रात्री १२.११ पुण्यकाल दुपारी १२.३५ ते रात्री ७.०४ मु.१५ | वैशाख कृ.९ शततारका<br>**२१**<br>**राजीव गांधी स्मृतिदिन**<br>**दहशतवाद विरोधी दिन** मु.२२ | ज्येष्ठ शु.२ मृग<br>**२८**<br>**स्वा.सावरकर जयंती**<br>पूर्णदास उपसकर महाराज पुण्यतिथी वेंगुर्ला<br>**चंद्रदर्शन** जिल्काद मु.२९ |
| **गुरु** | वैशाख शु.४ मृग<br>**१**<br>**महाराष्ट्र दिन**<br>**कामगार दिन**<br>**मराठी राजभाषा दिन**<br>विनायक चतुर्थी, श्री जोतिबा रथोत्सव चितळी ता.खटाव श्री भैरवनाथ यात्रा गोवे जि.सातारा जिल्काद मु.२ | वैशाख शु.११ उ.फाल्गुनी<br>**८**<br>सासवड यात्रा<br>**मोहिनी एकादशी**<br>सिध्दश्री देवेंद्रनाथ जयंती मढी जि.नगर, चौंडेश्वरीदेवी वर्धापन दिन कणकवली<br>**जागतिक रेडक्रॉस दिन** मु.९ | वैशाख कृ.३ ज्येष्ठा<br>**१५**<br>अगस्ती लोप<br>**जागतिक कुटुंब दिन** मु.१६ | वैशाख कृ.१० पूर्वा भाद्रपदा<br>**२२**<br>**संत मुक्ताबाई पुण्यतिथी मुक्ताईनगर जि.जळगाव**<br>राजा राममोहन राय जन्मदिन दिनबाबा पुण्यदिन इचलकरंजी भारतीय ज्येष्ठ मासारंभ मु.२३ | ज्येष्ठ शु.३ आर्द्रा<br>**२९**<br><br>**महाराणा प्रताप जयंती** (तिथीप्रमाणे)<br>रंभाव्रत जिल्हेज मु.१ |
| **शुक्र** | वैशाख शु.५ आर्द्रा<br>**२**<br>रामानुजाचार्य जयंती<br>**आद्य शंकराचार्य जयंती**<br>धारेश्वर यात्रा गार ता.दौंड देव वेतोबा उत्सव आरवली वेंगुर्ला,श्री ज्योतिर्लिंग रथोत्सव पाचवड ता.खटाव मु.३ | वैशाख शु.१२ हस्त<br>**९**<br>*प्रदोष*<br>**भगवंतदेव जन्मोत्सव बार्शी**<br>**कर्म.भाऊराव पाटील पुण्यदिन**<br>भराडीदेवी जन्मोत्सव वेंगुर्ला जानुबाईदेवी यात्रा करंजखोप ता.कोरेगाव मु.१० | वैशाख कृ.४ मूळ<br>**१६**<br><br>**संकष्ट चतुर्थी**<br>चंद्रोदय रात्री १०.२९<br>बिरदेव जन्मोत्सव पट्टणकोडोली शाह मन्सूरबाबा उरूस सुपा ता.बारामती जि.पुणे मु.१७ | वैशाख कृ.११ उ.भाद्रपदा<br>**२३**<br>**अपरा एकादशी**<br>संत श्री पारनेरकर महाराज वार्षिकोत्सव पारनेर जि.नगर अमृत सायं.४.०२ नं. मु.२४ | ज्येष्ठ शु.४ पुनर्वसु<br>**३०**<br>**गोवा राज्य दिन**<br>विनायक चतुर्थी<br>गुरू अर्जुनदेव शहीद दिन मु.२ |
| **शनि** | वैशाख शु.६ पुनर्वसु<br>**३**<br>**श्री नृसिंह नवरात्रारंभ**<br>गंगोत्पत्ती,गंगापूजन,गंगासप्तमी दिगंबरस्वामी पु.ति.गणेशपुरी ता.भिवंडी, दादा महा.पु.ति. शिवडाव ता.कणकवली मु.४ | वैशाख शु.१३ चित्रा (२ रा शनि)<br>**१०**<br>श्री स्वामी युक्तेश्वर जयंती देवी सातेरी भद्रकाली उत्सव आरोंदा ता.सावंतवाडी रांगोळी महाराज पुण्यतिथी मालवण जि.सिंधुदुर्ग मु.११ | वैशाख कृ.५ पूर्वाषाढा<br>**१७**<br>संत चोखोबामेळा पुण्यतिथी मंगळवेढा मु.१८ | वैशाख कृ.१२ रेवती (४ था शनि)<br>**२४**<br>*शनिप्रदोष*<br>**पंचक** दुपारी १.४८ पर्यंत मु.२५ | ज्येष्ठ शु.५ पुष्य<br>**३१**<br>**पुण्य.अहिल्याबाई होळकर जयंती**,कालिकादेवी रथोत्सव शिरसंगी ता.सौंदत्ती<br>**तंबाखू सेवन विरोधी दिन**<br>जिल्हेज मु.३ |

### तिथीविषयक माहिती

दि.१ चंद्रगिरीदेवी यात्रा संबरगी ता.अथणी
दि.२ श्री मरुळाराध्य जयंती
श्री दारुकाचार्य जयंती (वीरशैव)
श्री बसवकल्याण यात्रा जि.बिदर
तुकाईमाता यात्रा नवलेवाडी ललगुण ता.खटाव
सोनाईदेवी यात्रा सोनाईचीवाडी ता.पाटण
श्री महालक्ष्मीदेवी यात्रा हसूर ता.शिरोळ
श्री लक्ष्मीदेवी यात्रा वाघापूर ता.तासगाव
अमोघसिध्द भंडारा क।। डिग्रज ता.मिरज
दि.३ गुरुदेव मंदिर वर्धापन दिन बाजीरे ता.पोलादपूर जि.रायगड
पद्मावती यात्रा म्हसोबाचे कार्वे ता.वाळवा
श्री हनुमान लंका यात्रा भुये ता.करवीर
दि.४ **भद्रा सकाळी ७.१८ नंतर**
श्री भैरवनाथ रथोत्सव म्हासुर्णे ता.खटाव
दि.५ हंसराजस्वामी यात्रा परांडा
दुर्गामाता यात्रा मुचरी घोटलवाडी ता.संगमेश्वर
धोंडीराज महा.रथोत्सव पलूस जि.सांगली
श्री सिध्दनाथ रथोत्सव नेवरी ता.कडेगाव
दि.६ कवी शंभूराजू तुरेवाले पुण्यतिथी भिलवडी जि.सांगली
श्री मरिआई यात्रा कवठेगुलंद ता.शिरोळ
श्री भैरवनाथ यात्रा कामेरी ता.वाळवा
दि.८ मसोबादेव यात्रा सुळकूड ता.कागल
दि.९ श्री लक्ष्मीदेवी यात्रा प्रारंभ लक्ष्मी–दहिवडी ता.मंगळवेढा
दि.११ गोविंदानंद सरस्वती पु.ति.देगांव–पाटेश्वर जि.सातारा
श्री महालक्ष्मीदेवी यात्रा कोळे ता.सांगोला
श्री काळंबामाता वर्धापन दिन धोपेश्वर तिठवली ता.राजापूर
दि.११ **नृसिंह जयंती**–केळवली ता.राजापूर, सांगवडे व लाटवडे ता.हातकणंगले, कोळे–नरसिंहपूर ता.वाळवा
दि.१२ **वैशाख स्नान समाप्ती**
**पारशी दये मासारंभ**
**श्री साईबाबा उत्सव शिर्डी**
संत दामाजी महाराज पुण्यतिथी मंगळवेढा
शिरकाईदेवी उत्सव बडोदे
फिरंगाईदेवी यात्रा कुरकुंभ ता.दौंड जि.पुणे
उदमायदेवी यात्रा उध्दट ता.इंदापूर जि.पुणे
रेणुकादेवी यात्रा पिंपळगाव पिसा ता.श्रीगोंदा
श्री म्हसोबा यात्रा तरडगव्हाण ता.श्रीगोंदा
केशव गोविंद यात्रा शिंगवे केशव दत्ताचे ता.पाथर्डी जि.नगर
श्री अंबिका यात्रा तोंडोली ता.कडेगाव
श्री लक्ष्मीदेवी यात्रा गव्हाण जि.सांगली
नृसिंह यात्रा कुमठे ता.तासगाव जि.सांगली
मरीमातादेवी यात्रा आवळाई ता.आटपाडी
जानाई–मळाईदेवी यात्रा वसंतगड ता.कराड
गुण्याबा खराडे स्मृतिदिन दिवडी ता.माण
श्री जानुबाई यात्रा जायगाव, पुसेगाव व हिंगणे ता.खटाव जि.सातारा
दि.१४ श्री महालक्ष्मी अंबाबाईदेवी उत्सव कळंबे तर्फ ठाणे ता.करवीर
दि.२२ **जरथोस्तनो दिसो**
दि.२७ **धनिष्ठा नवक समाप्ती उ.रा.२.५०**
जोगेश्वरी यात्रा(जोगणी) उद्गाव ता.शिरोळ
देव जैतीर यात्रा तुळस ता.वेंगुर्ला
दि.३० श्री शिपलागिरी महाराज पुण्यतिथी देगाव वाळुज ता.मोहोळ

**उपनयन मुहूर्त**–दि.१,२,७,१४,२९
**जावळ मुहूर्त**–दि.१,२,५,७,८,९, दि.१२,१४,१६,२२,२३,२८,३०

**शुभ दिवस**–दि.१ स.११.२४ नं.शुभ दिवस, दि.२,३ शुभ,दि.४ मध्यम,दि.५,६,७ शुभ, दि.८ मध्यम, दि.९,१० शुभ दिवस, दि.१३ स.९.०८ नं.शुभ, दि.१४ मध्यम, दि.१६, १७,२० शुभ, दि.२२ दुपारी २.२१ प.शुभ, दि.२३ शुभ, दि.२४ रा.७.२१ प.शुभ,दि.२८, २९ शुभ, दि.३० मध्यम, दि.३१ शुभ दिवस

**त्याज्य दिवस**
दि.११,१५,१८,१९,२५,२६,२७

**भूमिपूजन मुहूर्त**–दि.१,३,५,७,८, दि.९,१४,१७,२२,२३,२४,२८,३१
**वास्तू मुहूर्त**–दि.२,३,८,९,१०,१४, दि.२३,२४,२८



दि.१ महाराष्ट्र दिन

**साखरपुडा मुहूर्त**–दि.१,५,६,७,८,९, दि.१०,१३,१४,१६,१७,२०,२३,२४,२८
**विवाह मुहूर्त**–दि.१,५,६,७,८,९,१०, दि.१३,१४,१६,१७,२०,२३,२४

।। श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।।

Mahalaxmi.org.in



सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२५३०३२५

मुंबई, पुणे व कोंकण आवृत्ती

# लेह-लडाख... एक अद्भुत सफर

लडाख हा भारताचा सर्वात उंच प्रदेश असून नैसर्गिकरित्या काहीसा चमत्कारिक आहे. समुद्रसपाटीपासून दहा हजार फुटांपासून ते वीस हजार फुटांपर्यंत या प्रदेशाची उंची आहे. ॲडव्हेंचरची आवड असणाऱ्या लोकांना हा भाग कायम खुणावत असतो. येथील उंच पर्वत व खोल दऱ्या डोळे पांढरे केल्याशिवाय राहत नाही. लेह ही लडाखची राजधानी आहे.


लडाखमध्ये फिरण्यासारखे बरेच भाग आहेत. लडाखचे सौंदर्य हे अगदी युरोपच्या तोडीचेच आहे. लडाखमध्ये साधारणतः जून ते सप्टेंबर या महिन्यात गेल्यास संपूर्ण लडाख फिरता येते. मात्र नोव्हेंबरनंतर बर्फ पडण्यास सुरुवात होते, ती अगदी एप्रिलपर्यंत असते. या दिवसात लडाखमधील सर्व रस्ते बंद होतात. तापमान अगदी उणे पंचवीस (-२५) डिग्रीपर्यंत असते. जून ते ऑक्टोबर या महिन्यात येथील तापमान साधारणतः चार डिग्रीपासून ते दहा डिग्रीपर्यंत असते. त्यामुळे फिरताना त्रास होत नाही आणि यावेळी रस्तेदेखील चालू असतात.

लडाख बघण्यासाठी सर्वप्रथम आपणास लेह गाठावे लागते. लेहला जाण्यासाठी दिल्लीहून दररोज विमाने आहेत, पण लेह साधारणतः तेरा हजार फूट उंचीवर असल्याने रोड ट्रीप करत जाणे केव्हाही चांगले. कारण रोडने जाताना आपण जसजशी उंची चढत जातो, तसतसे त्या उंचीमध्ये आपण समरस होत जातो. त्यामुळे लेहमध्ये पोहोचल्यानंतर आपणास उंचीचा त्रास होत नाही. हवेमध्ये ऑक्सिजनची थोडी कमतरता असल्याने थोडासा थकवा जाणवतो. लेहला जाणेसाठी श्रीनगरहून बाय रोड जाता येते. तिकडून शक्य नसल्यास चंदीगड-सिमला-मनाली या मार्गेही जाता येते. दोन्हीकडूनही साधारणपणे लेहला जायला दोन दिवस लागतात. लेहला पोहोचल्यानंतर एक दिवस विश्रांती घ्यावी, जेणेकरून त्या वातावरणात आपण समरस होऊन जातो. यामुळे डोके दुखणे अथवा ऑक्सिजनची कमतरता जाणवत नाही.

लेह हे सेंटर ठेवून लडाख फिरता येते. लेहमधून सर्वप्रथम नुब्रा व्हॅलीला जावे. हा प्रवास साधारणतः ७ ते ८ तासांचा आहे. नुब्रा व्हॅलीला जाताना 'खारदूंगला पास' हा जगातील सर्वांत उंचीवरचा म्हणजेच अठरा हजार फुटांवरचा मोटरेबल रोड पार करावा लागतो.

**नुब्रा व्हॅली-** नुब्रा व्हॅलीचा अर्थ फुलांची दरी असा होतो. नुब्रा व्हॅली ही समुद्रसपाटीपासून साधारणतः १०,००० फूट उंचीवर आहे. नुब्रा व्हॅलीमध्ये हुंडर नावाचे गाव आहे. या गावामध्ये राहण्याची सोय देखील उपलब्ध आहे. लेहपासून नुब्रा व्हॅलीचे अंतर हे १६० कि.मी. आहे. नुब्रा व्हॅलीमध्ये डिस्कीत नावाची मोठी मॉनेस्ट्री आहे. येथे गौतम बुध्दांचा मोठा पुतळा व्हॅलीच्या अगदी मधोमध आहे. व्हॅलीमध्ये इतक्या उंचीवर वाळवंट आहे की, त्या वाळवंटामध्ये उंटांच्या सफारी देखील आहेत. नुब्रा व्हॅलीमध्ये एक दिवस स्टे करावा लागतो. नुब्राला राहणेसाठी हॉटेल्स, होम स्टे, टेन्ट इ.ची सोय देखील आहे. पण त्यासाठी आगाऊ बुकिंग करावे लागते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून लेहच्या परतीचा प्रवास सुरू करावा लागतो. पुन्हा ७ ते ८ तासांचा हा प्रवास व 'खारदूंगला पास' करावा लागतो. या सर्व प्रवासासाठी लेहमधूनच गाडी ठरवून घ्यावी लागते. पुन्हा लेहमधून सकाळी पेंगाँग लेकच्या दिशेने प्रवासा करावा. तो देखील ७ ते ८ तासांचा प्रवास आहे. या प्रवासादरम्यान 'चांगला' हा पास लागतो. तो साधारण सोळा ते सतरा हजार फुटांवर आहे. तो पार करून आपण पेंगाँग लेककडे येतो.



पेंगाँग लेक

**पेंगाँग लेक-** पेंगाँग लेक हा अतिशय सुंदर व स्वच्छ निळ्याशार पाण्याचा लेक आहे. लेकच्या अवतीभोवती बर्फाचे डोंगर असून ते स्वर्गसुखाचा अनुभव देतात. येथे पर्यटकांची भरपूर गर्दी असते. पेंगाँग लेकला देखील एक दिवसाचा मुक्काम करावा लागतो. पर्यटकांना राहणेसाठी तेथे होम स्टे, हॉटेल्स, टेन्टची उपलब्धता आहे. पण या गोष्टींसाठी आगाऊ बुकिंग करावे लागते. या सर्व ठिकाणी खाण्याची देखील व्यवस्था आहे.

लडाखी भाषेमध्ये याला 'पेंगाँग त्सो' असे संबोधले जाते. हा तलाव १३,८०० फूट उंचीवर असून याची लांबी १३४ कि.मी. आहे. त्याचा पन्नास टक्के भाग हा चीनमध्ये, चाळीस टक्के भाग भारतामध्ये, तर उर्वरित दहा टक्के भाग हा विवादीत आहे. या लेकमधील पाणी खारे असून हा लेक हिवाळ्यात पूर्णपणे गोठतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा लेहकडे जाण्यासाठी बर्फाच्या डोंगर-दऱ्यांतून ७ ते ८ तासांचा प्रवास करून जावे लागते. सकाळी लवकर उठून कारगीलच्या दिशेने रवाना व्हावे लागते. हा प्रवास देखील ७ ते ८ तासांचा आहे.

**कारगील-** कारगीलला पोहोचल्यानंतर तेथील 'कारगील वॉर मेमोरिअल' हे आपल्या भारतीय सैन्य दलाचे बघण्यासारखे ठिकाण आहे. कारगील युध्दात वीरमरण पत्करलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ हे संग्रहालय बांधले आहे. जिथे तुम्ही युध्दात वापरलेली शस्त्रे, सैनिकांची पत्रे, डॉक्युमेंटरी पाहू शकता. १५ मिनिटांचा सैनिकांचा लाईव्ह-शो सुध्दा इथे दाखवला जातो. कारगीलला एक दिवस राहून पुन्हा लेहकडे निघता येते.

याशिवाय लेहमधील श्ये पॅलेस, शांती स्तूप, ठिकसे मॉनेस्ट्री इ. ठिकाणे देखील पाहण्यासारखी आहेत.

**श्ये पॅलेस (लेह पॅलेस)-** हा लेहमधील पूर्वीचा शहरी राजवाडा आहे. हा पॅलेस सेंगे नामग्याल यांनी इ.स. पूर्व १६०० मध्ये बांधला होता. हा पॅलेस नऊ मजली आहे. सर्वात वरच्या मजल्यावर राजघराण्यातील लोक राहत होते आणि खालच्या मजल्यावर घोड्यांचे तबेले, स्टोअर रूम इ. खोल्या होत्या. पॅलेसचा बराचसा भाग खराब अवस्थेत आहे. तसेच आतील भागाचे अवशेष फारसे शिल्लक नाहीत. पॅलेसच्या छतावरून लेह व आजूबाजूच्या परिसरातील विहंगम दृश्ये पहावयास मिळतात. भारतीय पुरातत्त्व विभागाकडून या पॅलेसची डागडुजी करण्यात येत आहे.

**शांती स्तूप-** शांती स्तूप हे एका बौध्द पांढऱ्या गुंफांचे स्तूप आहे. हे १९९१ मध्ये जपानी बौध्द भिक्खु ग्योमोया नाकामुरा आणि पीस पॅगोडा मिशनचा एक भाग म्हणून हे बांधण्यात आले. शांती स्तूप चौदावे दलाई लामा यांनी नमूद केलेल्या बुध्दांच्या अवशेषांवर आधारित आहे.

हे शांती स्तूप जागतिक शांती आणि समृध्दीला चालना देण्यासाठी तसेच २५०० वर्षांच्या बौध्द धर्माच्या स्मरणार्थ बांधण्यात आले. हे जपान आणि लडाखच्या लोकांमधील संबंधांचे प्रतीक मानले जाते. हे स्तूप केवळ त्याच्या धार्मिक महत्त्वामुळेच नव्हे, तर सभोवतालच्या परिसराची पॅनोरमिक दृश्ये प्रदान करण्याच्या ठिकाणामुळे देखील पर्यटकांचे मुख्य आकर्षण बनले आहे.



ठिकसे मॉनेस्ट्रीचे विहंगम दृश्य

**ठिकसे मॉनेस्ट्री-** मॉनेस्ट्रीला लडाखी भाषेमध्ये 'गोम्पा' म्हणतात. हा तिबेटी बौध्द धर्माच्या गेलुग स्कूलशी संलग्न एक मठ (मॉनेस्ट्री) आहे. हा मठ लेहच्या पूर्वेला १९ कि.मी.वर ठिकसे या टेकडीवर स्थित असून तिबेटमधील ल्हासा येथील पोटाला पॅलेसशी साधर्म्य असलेली वास्तू म्हणून ओळखली जाते. मध्य लडाखमधील हा सर्वात मोठा मठ असून सिंधू नदीच्या खोऱ्यात ११,८०० फूट उंचीवर आहे. १९७० मध्ये या मठात १४ व्या दलाई लामा यांच्या भेटी स्मरणार्थ मैत्रेय मंदिर बांधले गेले आणि ते येथील मुख्य आकर्षण आहे. या मंदिरात गौतम बुध्दांचा ४९ फूट उंचीचा भव्य असा पुतळा आहे.

लेह शहर चालत फिरून पहावे. या संपूर्ण प्रवासास साधारणपणे ८ ते १० दिवस लागतात. वातावरणातील सततच्या होणाऱ्या बदलामुळे आपल्याकडे ऊबदार कपड्यांची व्यवस्था असावी. उदा. हातमोजे, कानटोपी, जॅकेट्स इत्यादी. हा संपूर्ण प्रवास उंचीवरून व दऱ्या-खोऱ्यांतून आहे. रात्रीच्या वेळी वातावरण काही वेळेला मायनसमध्ये जाते, त्यामुळे दम्याचा त्रास असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच हा प्रवास करावा.

निसर्गातील निःशब्द शांततेचा आस्वाद घेण्यासाठी लेह-लडाख या निसर्गरम्य पर्यटन स्थळाला अवश्य भेट द्या.




लेह-लडाख प्रवासाचा रोड मॅप (नकाशा)

## ग्राहकांना महत्त्वाची सूचना

- श्री महालक्ष्मी दिनदर्शिका या प्रकाशनामध्ये शासनाची सुट्ट्यांची यादी, सरकारी सुट्ट्या प्रसिध्द होण्यापूर्वी छापलेल्या असतात, त्यामुळे त्यामध्ये काही वेळा बदल होण्याचा संभव असतो. तो ग्राहकांनी समजून घ्यावा.
- आमचेकडील नोंदीप्रमाणे यात्रा, उत्सव, जयंती, पुण्यतिथी आम्ही छापलेली असते. एखाद्या गावाच्या उत्सवाचे तारखेमध्ये फरक असल्यास तो आमचे निदर्शनास आणून द्यावा. दिलेल्या नोंदीप्रमाणे छपाई केलेली असते. यामध्ये संपादकांची कोणतीही चूक नसते.
- कॉम्प्युटरवर टाईपसेटिंग (डी.टी.पी.) होत असलेने काही वेळा महिन्यातील मजकूर जाणे या गोष्टी तांत्रिक दोषांमुळे होतात. याबाबत पूर्णपणे काळजी घेतली जाते. त्यातूनही एखादा दोष राहिल्यास ग्राहकांनी तो आमचे निदर्शनास आणून सहकार्य करावे.
- बायंडिंगमध्ये एखादा ४ महिन्यांचा फॉर्म दोन वेळा येणे, अशा चुका राहू नयेत याची काळजी घेतलेली असते. अशी दिनदर्शिका एखादेवेळी ग्राहकांना मिळाल्यास ती नजीकच्या दुकानदाराकडून बदलून घ्यावी किंवा कंपनीस कळवावे. कमी असलेला महिना पाठविला जाईल. याबाबत नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.
- कृपया सर्व ग्राहकांनी दिनदर्शिका घेतानाच पाहून घ्यावी.

(Subject to Kolhapur Jurisduction.)

प्रकाशन स्थळ : १२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
प्रसिध्दीचा नियतकाल : वार्षिक घटस्थापनेस
प्रकाशक : रोहन सदाशिव शिर्के
नागरिकत्व : भारतीय
मुद्रक : प्रिमिअर प्रिंटर्स, कोल्हापूर
संपादक : अमित जयवंत शिर्के
सहसंपादक : रणवीर श्रीपाद शिर्के
रोहन सदाशिव शिर्के
मालक : सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, १२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
मी जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे खरी आहे. -प्रकाशक

## संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय दि.१६ मे

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बारामती | १०.१७ | रत्नागिरी | १०.२३ | मार्गाव | १०.१४ | बेंगलोर | ०९.५३ | बिदर | १०.०५ |
| | | | | सातारा | १०.२१ | चिपळूण | १०.२१ | फोंडा | १०.१४ | बेळगाव | १०.१६ | कारवार | १०.१४ |
| | | | | कराड | १०.१९ | राजापूर | १०.१९ | पणजी | १०.१४ | बागलकोट | १०.०८ | हुबळी | १०.१० |
| मुंबई | १०.२९ | पनवेल | १०.२८ | कोल्हापूर | १०.१९ | दापोली | १०.२५ | छ.संभाजीनगर | १०.२२ | गोकाक | १०.१२ | धारवाड | १०.१० |
| ठाणे | १०.२८ | पालघर | १०.३० | सांगली | १०.१५ | सावंतवाडी | १०.१६ | अहमदनगर | १०.२० | निपाणी | १०.१६ | म्हैसूर | ०९.५५ |
| कल्याण | १०.२८ | नाशिक | १०.२६ | सोलापूर | १०.१३ | कणकवली | १०.१६ | धाराशिव | १०.१३ | अथणी | १०.१५ | हैद्राबाद | १०.०२ |
| डोंबिवली | १०.२८ | महाड | १०.२५ | पंढरपूर | १०.१७ | वेंगुर्ला | १०.१६ | लातूर | १०.०९ | मुधोळ | १०.१२ | दिल्ली | १०.३८ |
| अलिबाग | १०.२८ | पुणे | १०.२४ | मंगळवेढा | १०.१७ | म्हापसा | १०.१६ | नागपूर | १०.०८ | विजयपूर | १०.११ | बडोदा | १०.३६ |

## राशिभविष्य : मे २०२५

**मेष** – नावलौकिक वाढेल. पित्ताचा त्रास होईल. एकदम राग येईल. विवाह जुळेल. विद्याव्यासंग वाढेल. स्वाभिमानी रहाल. उत्तरार्धात आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. विलंब, त्रास, अडचणी अनुभवाल. पित्ताचे, पोटाचे विकार जाणवतील. चंद्रबल- ८, ९, १०, १२, १७

**वृषभ** – शेतीत गुंतवणूक कराल. मोठे खर्च निघतील. उत्तरार्धात पित्ताचा त्रास होईल. बोलण्याने माणसे दुखावली जातील. वारसाहक्काने लाभ होईल. सुवर्णालंकार खरेदी कराल. कायमस्वरूपी नोकरी मिळेल. वाहनसौख्य लाभेल. चंद्रबल- ११, १२, १३, १४, १५

**मिथुन** – मोठे आर्थिक लाभ होतील. बक्षिसे मिळतील. उत्तरार्धात खर्च वाढेल. धंद्यात स्पर्धा वाढेल. परदेशगमन घडेल. सामाजिक कार्यातून लाभ होईल. कौटुंबिक खर्च वाढेल. गाफील राहू नका. विवाह जुळेल. प्रॉपर्टीमध्ये गुंतवणूक कराल. चंद्रबल- ७, १३, १४, १५, १६, १७

**कर्क** – कामात अधिकार वाढतील. बुध्दिकौशल्याने लाभ होतील. परदेशगमन घडेल. कायदेशीर बाबींकडे लक्ष द्या. वडिलांना व भावंडांना कष्ट संभवतात. जोखमीची कामे सावधगिरीने करा. पित्ताचा त्रास होईल. वाहनसौख्य लाभेल. चंद्रबल- ८, ९, १०, १६, १७, १८

**सिंह** – सामाजिक, धार्मिक, पुण्याईची कामे कराल. उत्तरार्धात बढतीची शक्यता राहील. विवाह जुळेल. संतती होईल. शिक्षणात आघाडी घ्याल. लाभ होतील. भावनावेग आवरा. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. शेतीची कामे होतील. चंद्रबल- ७, ११, १२, १८

**कन्या** – मंदी जाणवेल. उत्तरार्धात सामाजिक कार्यात सहभाग राहील. पाप-पुण्याचा विचार करा. कामातील गुणवत्ता वाढवा. गुंतवणूक कराल प्रॉपर्टीची कामे होतील. भावनावेग आवरा. मानसन्मान लाभेल. आग्रही बनाल. चंद्रबल- ८, ९, १०, १३, १४, १५

**तूळ** – प्रवास घडेल. अहम्पणा राहील. उत्तरार्धात मंदी जाणवेल. बुध्दिकौशल्याने कामे होतील. विवाह जुळेल. परदेशगमन, तीर्थयात्रा घडतील. कर्तव्यात त्रुटी राहतील. संततीला त्रास संभवतो सामाजिक कार्यात भाग घ्याल. चंद्रबल- ७, ११, १२, १६, १७

**वृश्चिक** – संधी चालून येईल. उत्तरार्धात प्रवास घडेल. भावनावेग आवरा. शारीरिक बाबींकडे लक्ष द्या. भाग्यकारक अनुभव येतील. प्रॉपर्टीची कामे होतील. कला-क्रीडा क्षेत्रात आघाडी घ्याल. बुध्दिकौशल्याने लाभ होतील. चंद्रबल- ७, ८, ९, १०, १३, १४, १५

**धनू** – शिक्षणाला भाग्याची जोड लाभेल. उत्तरार्धात बुध्दिकौशल्याने लाभ होतील. आर्थिक प्राप्ती वाढेल. विवाह जुळेल. पुरस्कार लाभतील. भावंडांशी वाद टाळा. वाहनसौख्य लाभेल. पोटाची तक्रार, कर्णविकार जाणवेल. चंद्रबल- ८, ९, १०, ११ १२, १६, १७

**मकर** – घरगृहस्थीची काळजी घ्याल. उत्तरार्धात मनाची कुचंबणा होईल. कला-क्रीडा क्षेत्रात आघाडीवर रहाल. आर्थिक लाभ होतील. कौटुंबिक खर्च व समस्या वाढतील. लिखाणात चुका करू नका. वाहनसौख्य लाभेल. चंद्रबल- ११, १२, १३, १४, १५

**कुंभ** – गाफील राहू नका. भावनावेग आवरा. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. शैक्षणिक प्रगती होत राहील. विवाह जुळेल. प्रगतीसाठी नवीन उपाययोजना कराल. यश मिळेल. उत्तरार्धात घरगृहस्थीची काळजी कराल. क्रोध आवरा. चंद्रबल- ७, १३, १४, १५, १६, १७

**मीन** – आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. उत्तरार्धात कामात यश मिळेल. सावधगिरी बाळगा. निर्णायक कामात यश मिळेल. परदेशगमन घडेल. विवाह जुळेल. भावनावेग आवरा. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. कायदेशीर बाबी सांभाळा. चंद्रबल- ७, ८, ९, १०, १६, १७, १८

## पंचांग (मुंबई वेळेप्रमाणे)

मे २०२५ — श्री शालिवाहन शके १९४७ — वैशाख-ज्येष्ठ — विक्रम संवत् २०८१

| ता. | वार | तिथी | ता.मि. पर्यंत | नक्षत्र | ता.मि. पर्यंत | योग | ता.मि. पर्यंत | करण | ता.मि. पर्यंत | चंद्रराशी | सूर्योदय | सूर्यास्त | भा.सौर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मे | | वैशाख | | | | | | | | | | | वैशाख |
| ०१ | गुरु | शु.चतुर्थी | ११.२३ | मृग | १४.२० | अतिगंड | ०८.३३ | बव | २२.१४ | २७.१४ नं.मिथुन | ०६.१३ | १८.५९ | ११ |
| | | | | | | सुकर्मा | २९.३७ | | | | | | |
| ०२ | शुक्र | शु.पंचमी | ०९.१४ | आर्द्रा | १३.०३ | धृति | २७.१९ | कौलव | २०.२७ | मिथुन | ०६.१२ | १८.५९ | १२ |
| ०३ | शनि | शु.षष्ठी | ०७.५१ | पुनर्वसु | १२.३३ | शूल | २५.३९ | गर | १९.२८ | मिथुन | ०६.१२ | १९.०० | १३ |
| ०४ | रवि | शु.सप्तमी | ०७.१८ | पुष्य | १२.५२ | गंड | २४.४० | विष्टि | १९.२० | ०६.३६ नं.कर्क | ०६.११ | १९.०० | १४ |
| ०५ | सोम | शु.अष्टमी | ०७.३५ | आश्लेषा | १४.०० | वृध्दि | २४.१८ | बालव | २०.०१ | कर्क | ०६.११ | १९.०० | १५ |
| ०६ | मंगळ | शु.नवमी | ०८.३८ | मघा | १५.५० | ध्रुव | २४.२८ | तैतिल | २१.२४ | १४.०० नं.सिंह | ०६.१० | १९.०१ | १६ |
| ०७ | बुध | शु.दशमी | १०.१९ | पू.फाल्गुनी | १८.१६ | व्याघात | २५.०३ | वणिज | २३.२१ | सिंह | ०६.१० | १९.०१ | १७ |
| ०८ | गुरु | शु.एकादशी | १२.२८ | उ.फाल्गुनी | २१.०५ | हर्षण | २५.५५ | बव | २५.४० | २४.५६ नं.कन्या | ०६.०९ | १९.०१ | १८ |
| ०९ | शुक्र | शु.द्वादशी | १४.५५ | हस्त | २४.०८ | वज्र | २६.५७ | कौलव | २८.१२ | कन्या | ०६.०९ | १९.०२ | १९ |
| १० | शनि | शु.त्रयोदशी | १७.२९ | चित्रा | २७.१४ | सिध्दि | २८.०० | गर | अहोरात्र | कन्या | ०६.०८ | १९.०२ | २० |
| ११ | रवि | शु.चतुर्दशी | २०.०१ | स्वाती | अहोरात्र | व्यतिपात | २९.०० | गर | ०६.४६ | १३.४१ नं.तूळ | ०६.०८ | १९.०२ | २१ |
| १२ | सोम | पौर्णिमा | २२.२५ | स्वाती | ०६.१६ | वरियन | २९.५२ | विष्टि | ०९.१५ | तूळ | ०६.०७ | १९.०३ | २२ |
| १३ | मंगळ | कृ.प्रतिपदा | २४.३५ | विशाखा | ०९.०८ | परिघ | अहोरात्र | बालव | ११.३२ | २६.२६ नं.वृश्चिक | ०६.०७ | १९.०३ | २३ |
| १४ | बुध | कृ.द्वितीया | २६.२९ | अनुराधा | ११.४६ | परिघ | ०६.३३ | तैतिल | १३.३४ | वृश्चिक | ०६.०७ | १९.०४ | २४ |
| १५ | गुरु | कृ.तृतीया | २८.०२ | ज्येष्ठा | १४.०७ | शिव | ०७.०१ | वणिज | १५.१८ | वृश्चिक | ०६.०६ | १९.०४ | २५ |
| १६ | शुक्र | कृ.चतुर्थी | २९.१३ | मूळ | १६.०७ | सिध्द | ०७.१३ | बव | १६.४१ | १४.०७ नं.धनू | ०६.०६ | १९.०४ | २६ |
| १७ | शनि | कृ.पंचमी | २९.५७ | पूर्वाषाढा | १७.४३ | साध्य | ०७.०८ | कौलव | १७.३८ | धनू | ०६.०६ | १९.०५ | २७ |
| १८ | रवि | कृ.षष्ठी | अहोरात्र | उत्तराषाढा | १८.५१ | शुभ | ०६.४१ | गर | १८.०८ | २४.०३ नं.मकर | ०६.०५ | १९.०५ | २८ |
| | | | | | | शुक्ल | २९.५१ | | | | | | |
| १९ | सोम | कृ.षष्ठी | ०६.११ | श्रवण | १९.२९ | ब्रह्मा | २८.३५ | विष्टि | १८.०५ | मकर | ०६.०५ | १९.०५ | २९ |
| | | कृ.सप्तमी | २९.५१ | | | | | | | | | | |
| २० | मंगळ | कृ.अष्टमी | २८.५५ | धनिष्ठा | १९.३१ | ऐंद्र | २६.४९ | बालव | १७.२७ | मकर | ०६.०५ | १९.०६ | ३० |
| २१ | बुध | कृ.नवमी | २७.२१ | शततारका | १८.५७ | वैधृति | २४.३३ | तैतिल | १६.१३ | ०७.३४ नं.कुंभ | ०६.०४ | १९.०६ | ३१ |
| | | | | | | | | | | | | | ज्येष्ठ |
| २२ | गुरु | कृ.दशमी | २५.१२ | पू.भाद्रपदा | १७.४६ | विष्कंभ | २१.४८ | वणिज | १४.२१ | कुंभ | ०६.०४ | १९.०७ | १ |
| २३ | शुक्र | कृ.एकादशी | २२.३० | उ.भाद्रपदा | १६.०२ | प्रीति | १८.३६ | बव | ११.५४ | १२.०७ नं.मीन | ०६.०४ | १९.०७ | २ |
| २४ | शनि | कृ.द्वादशी | १९.२० | रेवती | १३.४८ | आयुष्मान | १५.०० | कौलव | ०८.५८ | मीन | ०६.०४ | १९.०७ | ३ |
| | | | | | | | | गर | २९.३७ | | | | |
| २५ | रवि | कृ.त्रयोदशी | १५.५२ | अश्विनी | ११.१२ | सौभाग्य | ११.०६ | विष्टि | २६.०२ | १३.४८ नं.मेष | ०६.०४ | १९.०८ | ४ |
| २६ | सोम | कृ.चतुर्दशी | १२.१२ | भरणी | ०८.२३ | शोभन | ०७.०१ | चतुष्पाद | २२.२२ | मेष | ०६.०३ | १९.०८ | ५ |
| | | | | कृत्तिका | २९.३२ | अतिगंड | २६.५४ | | | | | | |
| २७ | मंगळ | अमावास्या | ०८.३२ | रोहिणी | २६.५० | सुकर्मा | २२.५४ | किंस्तुघ्न | १८.४६ | १३.४१ नं.वृषभ | ०६.०३ | १९.०९ | ६ |
| | | ज्येष्ठ | | | | | | | | | | | |
| | | शु.प्रतिपदा | २९.०२ | | | | | | | | | | |
| २८ | बुध | शु.द्वितीया | २५.५४ | मृग | २४.२९ | धृति | १९.०८ | बालव | १५.२५ | वृषभ | ०६.०३ | १९.०९ | ७ |
| २९ | गुरु | शु.तृतीया | २३.१८ | आर्द्रा | २२.३८ | शूल | १५.४६ | तैतिल | १२.३२ | १३.३६ नं.मिथुन | ०६.०३ | १९.०९ | ८ |
| ३० | शुक्र | शु.चतुर्थी | २१.२२ | पुनर्वसु | २१.२८ | गंड | १२.५६ | वणिज | १०.१४ | मिथुन | ०६.०३ | १९.१० | ९ |
| ३१ | शनि | शु.पंचमी | २०.१५ | पुष्य | २१.०६ | वृध्दि | १०.४२ | बव | ०८.४२ | १५.४२ नं.कर्क | ०६.०३ | १९.१० | १० |

दि.१ मे रोजी सूर्योदयी : रवि-मेष, चंद्र-मिथुन, मंगळ-कर्क, बुध, शुक्र, शनि, नेपच्यून-मीन, गुरु, हर्षल-वृषभ, प्लुटो-मकर राशीत राहील. दि.६ मे बुध-मेष, दि.१४ मे रवि-वृषभ, दि.१४ मे गुरु-मिथुन, दि.२३ मे बुध-वृषभ, दि.३१ मे शुक्र-मेष राशीत प्रवेश करील.

वैशाख पौर्णिमा प्रारंभ- रविवार दि.११ मे रात्री ८.०१, समाप्ती- सोमवार दि.१२ मे रात्री १०.२५

वैशाख अमावास्या प्रारंभ- सोमवार दि.२६ मे दुपारी १२.१२, समाप्ती- मंगळवार दि.२७ मे सकाळी ८.३२